राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियानाच्या (NMAET) कृषि विस्तार उप अभियानातंर्गत, राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांमध्ये सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) योजनेंतर्गत सन २०१७-१८ मधील सर्वसाधारण प्रवर्गाचा रु. ४१०५/- व अनुसूचित जाती प्रवर्गाचा अखर्चीत रु. ८.५८ लक्ष निधी पुनर्जिवित करून चालू वर्षी विनियोगात आणण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृविका ०११७/प्र.क्र.१२/३-अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३१ मार्च, २०१९

वाचा -

१) केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय यांचे पत्र क्र. एफनं.३६-८/२०१७- अेई, विस्तार कक्ष, दि.२४.४.२०१७ ची दोन पत्रे
२) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.कृविका-२०१७/ प्र.क्र.१२/३अे, दि.०८.०६.२०१७
३) केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय यांचे पत्र क्र. एफनं.२७-३/२०१८- अेई, विस्तार कक्ष, दि.१९.४.२०१८
४) संचालक (आत्मा) यांचे पत्र क्र. आत्मा/प्र.क्र.०३-१८/लेखा/निधी/३६३/१८, दि. २५.०६.२०१८

प्रस्तावना -

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत (NMAET) कृषि विस्तार उप अभियान राबविण्यात येत आहे. सदर उप अभियानात राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांमध्ये सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) ही योजना केंद्र व राज्य शासनाच्या ६०: ४० अर्थसहाय्याच्या प्रमाणात राबविण्यात येते. केंद्र शासनाने सदर योजनेची सन २०१७-१८ मध्ये अंमलबजावणी करण्यासाठी दि. २४.४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पहिल्या हप्त्यापोटी सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. १८३०.३९ लक्ष, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रु. २३०.७८ लक्ष व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी रु. २०१.३६ लक्ष असा एकुण रु. २२६२.५३ लक्ष एवढा निधी वितरीत केला होता. तदनुसार संदर्भाधीन दि. ८.६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ मध्ये राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना सुधारणा करीता सहाय्य (आत्मा) योजना राबविण्यासाठी केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाने पहिल्या हप्त्यापोटी वितरित केलेल्या रु. २२६२.५३ लक्ष निधीस व त्या प्रमाणात राज्य शासनाच्या ४० % हिश्यानूसार एकुण रु. १५०८.३५ अशा एकुण रु. ३७७०.८८ लक्ष एवढ्या निधीस वित्तीय मान्यता देण्यात आली होती. सदर निधीपैकी सर्वसाधारण प्रवर्गासाठीचा केंद्र हिस्याचा रु. ४१०५ /- व अनुसूचित जाती प्रवर्गाचा रु.८.५२ /- लक्ष निधी विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाने खर्च होणार नसल्याने समर्पित केला होता.

दि.१९.४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर अखर्चीत निधी पुनर्जिवित (Revalidation) करून चालू वर्षात विनियोग करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.त्यानुषंगाने सन २०१७-१८ मधील राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांमध्ये सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) योजनेंतर्गत केंद्र हिस्याचा सर्वसाधारण प्रवर्गासाठीचा रु.४१०५/- व अनुसूचित जाती प्रवर्गासाठीचा रु.८.५२ लक्ष निधी पुनर्जिवित करून कृषि आयुक्त कार्यालयास वितरीत

करण्याची बाब व त्या समरुप राज्य हिश्याचा निधी जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) निधीतून उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढील निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

१. सन २०१७-१८ मधील राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांमध्ये सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) योजनेंतर्गत केंद्र हिस्याचा सर्व साधारण प्रवर्गासाठीचा रु. ४१०५/- निधी (रुपये चार हजार एकशे पाच फक्त) सन २०१८-१९ या वर्षात पुनर्जिवित करून आयुक्त (कृषि) यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्या समरुप राज्य हिश्याचा निधी जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) निधीतून उपलब्ध करुन घ्यावा. अशाप्रकारे या योजनेचा केंद्र व राज्य हिश्याचा (DPDC मधून) मिळून एकुण रु. ६८४२/- (रुपये सहा हजार आठशे बेचाळीस फक्त) निधी चालू वर्षी सर्वसाधारण प्रवर्गाचा निधी पुनर्जिवित करून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१७-१८ मधील राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांमध्ये सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) योजनेंतर्गत केंद्र हिस्याचा अनुसूचित जाती प्रवर्गासाठीचा रु. ८.५२ लक्ष निधी (रुपये आठ लक्ष बावन्न हजार फक्त) सन २०१८-१९ या वर्षात पुनर्जिवित करून आयुक्त (कृषि) यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्या समरुप राज्य हिश्याचा निधी जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) निधीतून उपलब्ध करुन घ्यावा. अशाप्रकारे या योजनेचा केंद्र व राज्य हिश्याचा (DPDC मधून) मिळून एकुण रु. १४.२ लक्ष (रुपये चौदा लक्ष वीस हजार फक्त) निधी चालू वर्षी अनुसूचित जाती प्रवर्गाचा निधी पुनर्जिवित करून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. योजनेकरीता प्रत्यक्ष वितरीत करण्यात येणा-या निधीच्या मर्यादेत योजनेची अंमलबजावणी करावी, तसेच सदर खर्च चालू वर्षी पुढे नमूद करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. डी-३,
२४०१ पीक संवर्धन,
१०९ विस्तार व प्रशिक्षण
(०१)(४४) राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा
करिता सहाय्य (आत्मा) -उप अभियान (केंद्र हिस्सा ६०%) (सर्वसाधारण प्रवर्ग)
(२४०१ ४४४५), ३३ अर्थसहाय्य

मागणी क्र. डी-३,
२४०१ पीक संवर्धन,
७८९ - अनुसूचित जाती उपयोजना
(००)(२६) कृषि उन्नती योजना- कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा
करिता सहाय्य -उप अभियान (केंद्र पुरस्कृत योजना) (केंद्र हिस्सा ६०%) (अनुसूचित जाती)
(२४०१ A४३२), ३३ अर्थसहाय्य

४. सन २०१८-१९ मध्ये राज्यात सदर योजनेची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्याच्या दृष्टिने, पुढील अधिकाऱ्यांना नियंत्रण तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

अ.क्र.	स्तर	नियंत्रण अधिकारी	आहरण व संवितरण अधिकारी
१.	आयुक्तालय स्तर	आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे	सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२.	जिल्हास्तर	संबंधित प्रकल्प संचालक आत्मा	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी.

५. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला सर्व निधी सर्व जिल्हयांना पीएफएमएस प्रणालीव्दारे वितरीत करावा.

६. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करून देण्यात आलेल्या सर्वसाधारण प्रवर्ग व अनुसूचित जाती प्रवर्गाच्या निधीचा निधीचा वापर अनुक्रमे सर्वसाधारण प्रवर्ग व अनुसूचित जाती प्रवर्गाच्या लाभार्थ्यांसाठीच करावा.

हा शासन निर्णय वित्त परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ नुसार विहित केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आणि सामाजिक न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३६१/विघयो, दि.१३.३.२०१९, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४२१/१४३१, दि.२९.३.२०१९ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ९९/वित्त विभाग/व्यय-१, दि. ३१.३.२०१९ अन्वये, सन २०१७-१८ मधील अखर्चीत निधी पुनर्जिवित करून चालू वर्षाकरिता खर्च करण्यास दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने व त्यांच्या सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३११४४८५४८५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.03.31 15:01:46 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

१) मा.मंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा.राज्य मंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) अपर मुख्य सचिव (नियोजन) ,नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
४) प्रधान सचिव (सा न्या. व वि.स), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
५) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) आयुक्त (कृषि) तथा राज्य नोडल अधिकारी आत्मा, कृषि आयुक्तालय, पुणे

७) संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे
८) सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आत्मा नियामक मंडळ (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
९) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
१०) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा उपाध्यक्ष आत्मा नियामक मंडळ
१२) संचालक वनामती, नागपूर
१३) उप संचालक, आत्मा, सामेती, पुणे
१४) सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१५) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
१६) सर्व प्रकल्प संचालक (आत्मा),
१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१८) कृषि विकास अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२०) महालेखापाल - १/२(लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर
२१) वित्त विभाग (का.व्यय-१) (अर्थसंकल्प-१२)(अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.३२
२२) नियोजन विभाग, कार्यासन - १४१४, १४३१, मंत्रालय, मुंबई.३२
२३) कार्यासन अधिकारी, २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४) निवड नस्ती (कार्यासन-३अे).